Vivekanand Shikshan Sanstha's
**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**
Samarthnagar, Aurangabad.

Date :

# PRESS RELEASE

## विवेकानंद महाविद्यालयाच्या खेळाडूंचे आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये यश

नुकत्याच पार पडलेल्या विविध आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करत सुवर्ण पदक मिळवण्याची उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. त्यामध्ये अजय दाभाडे या खेळाडूंनी जलतरण क्रीडा स्पर्धेमध्ये 200 मीटर वैयक्तिक मिडले या क्रीडा प्रकारांमध्ये सुवर्णपदक मिळवले त्याचबरोबर रवि दांडगे या खेळाडूने 50 मीटर व 100 मीटर फ्री स्टाइल या क्रीडा प्रकारांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करत दोन सुवर्णपदक मिळवले. तसेच मल्लखांब या क्रीडा प्रकारांमध्ये सोपान क्षीरसागर या खेळाडूने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले. त्याचबरोबर सरिता रणशूर या विद्यार्थिनीने दहा किलोमीटर (10 km) क्रॉसकंट्री स्पर्धेमध्ये उत्कृष्ट वेळेची नोंद करत कास्य पदक पटकावले.

या सर्व खेळाडूंचे यशाबद्दल विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अक्षय भाऊ शिसोदे, सचिव श्री श्रीमंतराव शिसोदे, उपाध्यक्ष श्री अमर भाऊ शिसोदे, सहसचिव श्री यशोद पाटील, कोषाध्यक्ष श्री तुषार भाऊ शिसोदे, प्रशासकीय अधिकारी श्री प्रभाकर मोरे, प्राचार्य प्रोफेसर श्याम शिरसाट, उपप्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे व डॉ. राजेंद्र शेजुळ आदींनी अभिनंदन केले. या सर्व खेळाडूंना विवेकानंद महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख डॉ. गोविंद कदम यांचे मार्गदर्शन लाभले.



